**अभियोग साक्षीदार क्र.२**

**निशाणी क्र.९६**

शपथेवर कथन करते की,

नाव – **विजय जयराम जामदार**

वय – ५९ वर्षे, कामधंदा – शेती

रा. – चारी नं.१, धोत्रा, ता. कोपरगाव, जि.अ.नगर.

**सरतपास– अभियोगपक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री. पी. डी. रणधीर –**

फिर्यादी अशोक तुकाराम जामदार हे माझ्या शेजारी राहतात. दिनांक २८.१०.२०१६ रोजी सकाळी ७.०० वाजता अशोक तुकाराम जामदार यांच्या घरासमोर रस्त्यावरती घटना घडली होती. त्यावेळी आरडाओरडा झाल्याचे मला ऐकायला आले. त्यावेळी मी आणि माझा लहान भाऊ संजय जयराम जामदार व अनिल रावसाहेब जामदार असे तेथे गेलो. सदर ठिकाणी मारामारी सुरु होती. अशोक जामदार व सखाराम जामदार यांच्यामध्ये वाद सुरु होते. अशोक जामदार हे सखाराम जामदार यांना मारहाण करत होते. मिना अशोक जामदार ही सखाराम जयराम जामदार यांना मारहाण करत होती. सखाराम जामदार हे खाली रस्त्यावर पडलेले होते. सखाराम जामदार याने त्याच्या हातातील काठीने अशोक जामदार यांच्या डोक्यात तसेच त्यांची आई भिमाबाई यांच्या कपाळावरती मारहाण केली असे काही घडले नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करित नसल्याने सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास फितुर घोषित करण्यात येवुन उलटतपासाच्या स्वरुपातील प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. सखाराम जामदार याने त्याच्या हातातील काठीने अशोक जामदार यांच्या डोक्यात तसेच त्यांची आई भिमाबाई यांच्या कपाळावरती मारहाण केली हे म्हणणे खरे नाही. कैलास जामदार, सतिष जामदार, अनिल जामदार, भास्कर

जामदार, अरुण जामदार व रावसाहेब जामदार हे देखील तेथे आले व त्यांनी मिनाबाई व भिमाबाई यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली हे म्हणणे खरे नाही. अशोक याने सदर घटनेबाबत आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली हे म्हणणे खरे आहे.

३. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता हे म्हणणे खरे आहे. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग–अ वाचुन दाखविला. तो माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर नाही. पोलिसांनी माझ्या जबाबामध्ये तसे का नमुद केले आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. फिर्यादी व आरोपी हे माझ्या भावकीतील आहेत हे म्हणणे खरे आहे. आरोपींशी माझे चांगले संबंध आहेत हे म्हणणे खरे आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास – आरोपीतर्फे श्री.जे. ए. जोशी वकील साहेब** –

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Digitally signed by SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Date: 2026.04.21 15:18:45 +0530

(संजय छ. खैरनार)

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोपरगाव, जि. अहमदनगर.

कोपरगाव.

दिनांक – २१.०४.२०२६